केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रमाकरीता सामाजिक विशेष घटक योजनेंतर्गत सन २०१८-१९ मधील उपलब्ध तरतुदीनूसार केंद्र हिश्श्यापोटी रू.९५९३.६८ लक्ष व राज्य हिश्श्यापोटी रु.६६४२.१६ लक्ष अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनएचएम-०६१८/प्र.क्र.३४८/आरोग्य-७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ३० मार्च, २०१९.

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. G.२७०१७/३९/२०१८-१९-NHM-Fin/११, दिनांक १८ डिसेंबर, २०१८.
३) केंद्र शासनाचे पत्र क्र. G.२७०१७/१७/२०१८-१९-NHM-Fin/२, दिनांक २४ डिसेंबर, २०१८.
४) केंद्र शासनाचे पत्र क्र. G.२७०१७/७३/२०१८-१९-NHM-Fin/६, दिनांक २४ डिसेंबर, २०१८.
५) केंद्र शासनाचे पत्र क्र. G.२७०१७/१७/२०१८-१९-NHM-Fin/७, दिनांक २४ डिसेंबर, २०१८.
६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.एनएचएम-०६१८/प्र.क्र.३४८/आरोग्य-७, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८.
७) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.एनएचएम-०६१८/प्र.क्र.३४८/आरोग्य-७, दिनांक ७ जानेवारी, २०१८.
८) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र.राआसोम/एफएमजी/ कें. रा. हि. /८४९५८-९६५/२०१८-१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१८.
९) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र.राआसोम/एफएमजी/ कें. रा. हि. /९२००७-१५/२०१८-१९, दिनांक ४ जानेवारी, २०१९ .

प्रस्तावना :-

ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरदायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल, २००५ पासून राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान सुरू केले आहे. सदर योजनेअंतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम

(Reproductive child Health), नियमित लसीकरण, मिशन फ्लेक्सीपुल, पायाभूत सुविधांचे बळकटीकरण व पल्स पोलियो लसीकरण इत्यादी आरोग्य सेवा देण्यात येतात. त्या अनुषंगाने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रमाकरीता सामाजिक विशेष घटकाकरिता (SCSP) ६०% केंद्र हिस्सा त्यास समरुप ४०% राज्य हिश्श्याचे अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने संदर्भ क्र.१ येथील शासन परिपत्रकातील परिच्छेद-४ मधील तरतुदीनूसार याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) कार्यक्रमाकरीता सामाजिक विशेष घटकाकरीता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी ६० टक्के केंद्र हिश्श्याकरीता रु.१६९५४.६८ लक्ष एवढी अर्थसंकल्पिय तरतुद केलेली आहे. त्यास अनुसरुन राज्य शासनाने त्यांचा ४० टक्के हिस्सा रु.१४४७४.४९ लक्ष एवढी अर्थसंकल्पिय तरतुद केलेली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रम सामाजिक विशेष घटकाकरिता (SCSP) संदर्भ क्र. ६ च्या शासन निर्णयान्वये रु.५८८९.०० लक्ष (रुपये अठ्ठावन्न कोटी एकोणनव्वद लक्ष फक्त) इतकी रक्कम ६०% केंद्र हिस्सा म्हणून तर त्यास समरुप ४०% म्हणजेच रु.३९२६.०० लक्ष (रुपये एकोणचाळीस कोटी सव्वीस लक्ष फक्त) इतका राज्य हिस्सा राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. उर्वरित तरतूदीतून संदर्भ क्र. ७ अन्वये रु.१४७२.०० लक्ष (रुपये चौदा कोटी बाहत्तर लक्ष फक्त) इतकी रक्कम ६०% केंद्र हिस्सा म्हणून तर त्यास समरुप ४०% राज्य हिस्सा म्हणजेच रु.९८१.३३ लक्ष (रुपये नऊ कोटी ऐक्यांशी लक्ष तेहतीस हजार फक्त) इतका राज्य हिस्सा राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. उपलब्ध तरतूदीतून केंद्र हिस्सा रु.९५९३.६८ (रुपये पंच्याण्णव कोटी त्र्याण्णव लक्ष अडुसष्ट हजार फक्त) त्यास समरुप राज्य हिस्सा रु.६६४२.१६ लक्ष (रु. सहासष्ट कोटी बेचाळीस लक्ष सोळा हजार फक्त) इतका निधी राज्य आरोग्य सोसायटीस देणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च खालीलप्रमाणे नमूद केलेल्या योजना निहाय ६०% केंद्र हिश्श्यापोटी व ४०% राज्य हिश्श्यापोटी नमूद लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-१९ साठी मंजूर करण्यात आलेल्या उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

अ. क्र.	तपशिल	केंद्र /राज्य हिस्सा (रु.लाखात)		
		लेखाशिर्ष	सुधारित अर्थ संकल्पिय तरतुद	मागणी रक्कम (६०% केंद्र व ४०% राज्य हिस्सा)
१	आर-१ २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ७८९ सामाजिक विशेष घटकाकरिता (०१)(०३) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (केंद्र हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर)	२२१०F४८९	१६९५४.६८	९५९३.६८
२	आर-१ २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च (०१) किमान गरजा कार्यक्रम (०१)(१६) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (केंद्र पुरस्कृत योजना - राज्य हिस्सा ४० टक्के) (अजाउयो) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर)	२२१०E४३७	१४४७४.४९	६६४२.१६

४. वित्त विभागाच्या दिनांक २ एप्रिल, २०१८ च्या शासन परिपत्रका सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनु.क्र.८ मधील मुद्दा क्र.१ ते १० मधील अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याचे कार्यक्रम प्रमुख / संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास कळविले असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक २ एप्रिल, २०१८ च्या शासन परिपत्रकाच्या परिशिष्ठातील मुद्दा क्र. १ ते १० मधील अटींची पूर्तता झाली असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने

राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरिल निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बॅक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येणार आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

५. सदरचे अनुदान सशर्त असून वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/प्र.क्र.८५/ २०१३/ अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३१/अर्थोपाय, दिनांक १७ जानेवारी, २०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201903281116180517 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN VASANTRAO WAHUL

Digitally signed by KIRAN VASANTRAO WAHUL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e32592d7ee16b3f0ea3e5db304272db056899514ece7f762990f9b1a0c5049, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=2e35734ec976bf5657815fb42c4d25b0b3c23b4c69600638f3deb172ac9e37f4, ou=PHD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN VASANTRAO WAHUL
Date: 2019.03.30 19:26:48 +05'30'

(किरण वाहुल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.

३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पूणे
६. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
११.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१२.निवडनस्ती (आरोग्य -७) .